२०१९-२०२०

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## १९ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०१९ - ३१ मार्च २०२०

# महाराष्ट्र राज्य

## मानवी हक्क आयोग

### १९वा वार्षिक अहवाल

### १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०

वाय ४६२-१

## वार्षिक अहवाल – वर्ष २०१९-२०

उपोद्घात

**"काही थोड्या व्यक्तींच्या कायदेशीर स्वारस्याचे रक्षण करणे एवढाच केवळ सरकारचा हेतू आहे असे नाही तर सर्व व्यक्तींचे हक्क व कल्याण यांचे संवर्धन करणे हा ही सरकारचा हेतू आहे."**

– फ्रँकलीन डी. रुसूवेल्ट

दि.०१.०४.२०१९ ते दि.३१.०३.२०२० या वर्षाचा १९ वा वार्षिक अहवाल सादर करताना आयोगाला आनंद होत आहे.

मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क. मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरुपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार व मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे व त्यांना प्रोत्साहन देणे हे त्या-त्या राज्यांचे कर्तव्य आहे. त्यानुसार भारतामध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अस्तित्वात आला.

या अधिनियमाचे उद्दिष्ट सीमीत असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करु शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करु शकतो असला तरीही महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वतःहून पुढाकार घेऊन चौकशी करणे याद्वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जागरुकता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रयत्नांचे फळ म्हणून मोठ्या संख्येने तक्रारी प्राप्त झाल्या व त्यांची चौकशी करण्यात आली. आयोगाला मिळणारे अनुदान व पायाभूत सुविधा मर्यादित असल्या, तरीही आयोग मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची गाऱ्हाणी व तक्रारी याकडे लक्ष देत आहे. महाराष्ट्र राज्यात मानवी हक्कांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे व सर्व समाजाच्या कल्याणासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे संवर्धन करणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रयत्न करीत आहे. या अहवालामध्ये आयोगाच्या या प्रयत्नांचे प्रतिबिंब दिसते.

(एम.ए.सईद)
प्रभारी अध्यक्ष / सदस्य

(तुकाराम मुंढे)
सचिव

वाय ४६२-१अ

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | उपोद्घात | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १. | परिचय | १ ते ४ |
| २. | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी | ५ ते ७ |
| ३. | मा. अध्यक्ष व सदस्य यांच्या भेटी | ८ ते १० |
| ४. | स्त्रोत | ११ |
| ५. | उदाहरणादाखल खटले | १२ ते २२ |
| ६. | आयोगाने केलेल्या शिफारशींची शासनाने केलेली पूर्तता आणि अव्हेर | २३ ते २४ |

## विभाग १ – परिचय

मानवी हक्क म्हणजे मानवी वर्तणूकीच्या दर्जाची विवरण करणारी काही नैतीक तत्वे किंवा रिवाज होय. सदर मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये नियमितपणे संरक्षण होते. सर्वसाधारणपणे जे मानवी हक्क म्हणजे असे मूलभूत हक्क की जे मानवाला तो केवळ मानव आहे म्हणून त्याच्या जन्मापासून प्राप्त असलेले असे स्वाभाविक हक्क की जे अनन्य संक्राम्य आहेत व जे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात किंवा अन्य स्थिती यांच्या पलीकडे आहेत. ते हक्क सर्वत्र लागू पडतात व सार्वत्रिक आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला सारखेच आहेत या अर्थाने ते हक्क समतावादी आहेत. त्यांच्यासाठी समरसतेची आवश्यकता असते. तसेच कायद्याच्या नियमांची आवश्यकता असते व त्याद्वारे एखाद्या व्यक्तीने अन्य व्यक्तींच्या मानवी हक्कांचा सन्मान करावा असे त्या व्यक्तीवर बंधन येते.

मानवी इतिहासामध्ये हक्क व स्वातंत्र्याच्या कल्पना कोणत्या ना कोणत्या तरी स्वरुपामध्ये अस्तित्वात असल्या तरीही मानवी हक्कांच्या पूर्वीच्या कल्पना या मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांशी फारशा जुळत नव्हत्या. मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पना यांचा उगम आपल्याला युरोपमधील पुनरुज्जीवन व प्रोटेस्टंटांच्या सुधारणा यातून शोधता येईल. तसेच मध्य युगामध्ये प्रभवाशाली असलेल्या सरंजामशाही पद्धती व धार्मिक रुढीप्रियता यांचा अस्त होणे यातूनही मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांचा उगम शोधता येईल.

रेडक्रॉसच्या आंतरराष्ट्रीय समितीचे संस्थापक श्री. हेन्री डुआंट यांच्या प्रयत्नांमुळे १८६४ व १९४९ यांच्यामध्ये जिनेव्हा संकेत अस्तित्वात आले. हे संकेत सशस्त्र संघर्षामध्ये गुतलेल्या व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण करतात व ते १८९९ व १९०७ च्या हेग संकेतावर आधारित आहेत. धर्मनिरपेक्ष आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उपजत स्वरुपामध्ये युद्ध व युद्ध विषयक गुन्हे याबाबतच्या कायद्यांना औपचारिक स्वरुप देण्याचा हा आंतरराष्ट्रीय समाजाचा पहिला प्रयत्न होता. दुसऱ्या महायुद्धामुळे या संकेतामध्ये सुधारणा झाली व ते संकेत आंतरराष्ट्रीय समाजाने १९४९ मध्ये पुन्हा स्वीकारले.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या विश्वामध्ये मानवी हक्कांचे सामाजिक व कायदेशीर पद्धतीने संरक्षण होणे हे मूलभूत स्वातंत्र्य असावे याची काळजी वाढू लागली. संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना व संयुक्त राष्टसंघाच्या सनदीच्या तरतुदी या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा व पद्धतीसाठी एक सर्वसमावेशक व्यवस्थेचा / यंत्रणेचा पाया ठरला.

मानवी हक्क सार्वत्रिक असणे, ते हक्क सर्व जगभरात समान असणे हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्यांचा पायाभूत मानक ठरला. १९४८ साली मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये या तत्त्वावर पहिल्यांदा भर देण्यात आला व अनेक आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संमेलने, ठराव व घोषणांमध्ये या तत्त्वांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. उदाहरणार्थ १९४३ च्या व्हिएन्ना आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये असे नोंदले गेले की देशांची राजकीय, आर्थिक व सांस्कृतीक प्रणाली किंवा यंत्रणा कोणतीही असली तरी सर्व मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणे व त्यांचे संरक्षण करणे हे देशांचे कर्तव्य आहे.

मानवी हक्कांबाबतची सार्वत्रिक घोषणा यांच्या कलम १ मध्ये असे म्हंटले आहे "सर्व मानव स्वतंत्ररीत्या जन्माला आले आहेत व ते सन्मान/प्रतिष्ठा व हक्क याबाबत समान आहेत. त्यांना समजूतदारपणा व सद्‌सद् विवेकबुद्धी लाभली आहे व त्यांनी बंधुत्त्वाच्या भावनेने एकमेकांबरोबर वागावे." भारताच्या घटनेमध्ये सुद्धा मानवी हक्कांच्या सर्व सार्वत्रिक घोषणेचा मूलभूत हक्क म्हणून समावेश केला आहे. भारताच्या संसदेने १९४३ मध्ये **मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३** पारित केला. हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध सुरक्षितता प्रदान करतो. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय मानव हक्क आयोग व राज्य मानव हक्क आयोगाची स्थापना करण्याचा तसेच जिल्हा स्तरावर मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे. आंतरराष्ट्रीय संकेत व मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ यांच्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापन दि. ६ मार्च २००१ रोजी झाली.

### आयोगाची रचना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे :–

- जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल.
- अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षे अनुभव आहे, अशी व्यक्ती आयोगाची सदस्य असेल.
- अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.

**आयोगाचे कार्य**

शासकीय सेवकाकडून मानवी हक्कांचा भंग होत आहे का यावर लक्ष ठेवणे व त्याबाबत चौकशी करणे हे मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्य आहे.

अधिनियमाच्या कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाली नमूद केलेली सर्व कार्य आयोग करते.

(अ) पीडीताने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणीही सादर केलेल्या तक्रारीवरुन आयोग स्वतःहून किंवा न्यायालयाच्या आदेशावरुन आयोग खालील बाबतीत कृती करु शकतो

- मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा असे उल्लंघन होण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे;
- मानवी हक्कांचे असे उल्लंघन होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात हलगर्जीपणा होणे;

(ब) मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे / झाले आहे असे आरोप असलेल्या न्यायालयासमोर असलेल्या कोणत्याही खटल्यामध्ये न्यायालयाच्या अनुमतीने मध्यस्थी करणे;

(क) त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यामध्ये काहीही तरतूद असली तरीही राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही संस्थेला, तुरुंगाला भेट देणे की जेथे माणसांना उपचारासाठी, सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी स्थानबद्ध केले आहे. सदर स्थानांमध्ये असलेल्या व्यक्तींसाठीच्या रहाण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करणे व त्याबाबत शिफारसी करणे यासाठी या भेटी दिल्या जातील;

(ड) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनेमध्ये किंवा अन्य कोणत्याही कायद्यामध्ये कोणते सुरक्षा उपाय योजले आहेत याचा आढावा घेणे व त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचवणे;

(इ) मानवी हक्कांचा उपभोग घेण्यात अडथळे आणणाऱ्या कोणत्याही घटकांचा, की ज्यात दहशतवादाचा समावेश आहे, आढावा घेणे व त्यावर उपाययोजना सुचवणे;

(फ) मानवी हक्कांबाबत करार व अन्य आंतरराष्ट्रीय कागदपत्रे, उपाययोजना यांचा अभ्यास करणे व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी शिफारसी करणे;

(ग) "मानवी हक्क" या क्षेत्रामध्ये संशोधन करणे व अशा संशोधनाला प्रोत्साहन देणे;

(ह) समाजाच्या अनेक भागांमध्ये मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे व अशा हक्कांच्या रक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांची विविध माध्यमांकडून प्रसिद्धी, संमेलने व अन्य साधनांमधून करणे;

(आय) "मानवी हक्क" या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटनांच्या व अन्य संघटनांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे;

(ज) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी अन्य कोणतीही कार्ये.

**आयोगाकडे तक्रार करतानाची कार्यपद्धती किंवा आयोग स्वतःहून कृती करील तेव्हाची कार्यपद्धती**

1. मानवी हक्कांचा भंग झाल्याची तक्रारी पीडीत व्यक्ती किंवा त्या व्यक्तीतर्फे अन्य व्यक्ती तक्रार दाखल करु शकेल. सदर तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत करता येईल. सदर तक्रार ऑनलाईन किंवा टपालाने सादर करता येईल.
2. तक्रार करताना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही, कोणतेही कोर्ट फी तिकीट लावावे लागणार नाही. वकील नेमण्याची गरज नाही.
3. कोणत्याही शासकीय सेवकांविरुद्ध तक्रार करायची असेल तर ती आयोगाच्या अध्यक्षांना उद्देशून करायची असते व त्यामध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे.

- तक्रारदाराचे पूर्ण नाव
- तक्रारदाराचा पूर्ण टपालाचा पत्ता
- टेलिफोन क्रमांक / ई-मेल क्रमांक
- घटनेची तारीख व स्थळ

- घटना केव्हा घडली ती वेळ
- मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांचा तपशील स्पष्ट करा.
- कोणत्या शासकीय सेवकाविरुद्ध / शासकीय विभागाविरुद्ध / शासकीय संस्थेविरुद्ध / शासकीय प्राधिकरणाविरुद्ध तक्रार केली जात आहे?
- सदर बाब कोणत्याही न्यायालयात, राष्ट्रीय मानव हक्क आयोगात, न्यायासनात किंवा अन्य वैधानिक मंचाकडे प्रलंबित आहे काय?
- ज्या अनुतोषाची मागणी केली आहे तो अनुतोष

**आयोगाकडे येण्याचे फायदे**


| | | |
|---|---|---|
| संस्थात्मक स्वायतत्ता व स्वातंत्र्य | सोपी उपलब्धता | कोणतेही शुल्क आकारले जात नाही |
| कमी किचकट कार्यपद्धती | त्वरीत न्याय | कोणत्याही व्यावसायिक वकिलाच्या सहा-य्याची आवश्यकता नाही |

## भाग २ – विभाग आयोगाने हाताळलेल्या तक्रारी


दि. १ जानेवारी, २०१९ ते दि. ३१ डिसेंबर, २०१९ या काळामध्ये आयोगाला एकूण ४,६५९ तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्त्यामध्ये नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारी यांचा तपशील दिला आहे.

### दि. १ जानेवारी, २०१९ ते दि. ३१ डिसेंबर, २०१९ या काळातील खटल्यांचा सांख्यिकी तक्ता

| आधी प्रलंबित असलेले खटले / प्रारंभीची शिल्लक | नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी | सदर कालखंडातील एकूण तक्रारी | वर्षात एकूण निकालात काढलेल्या तक्रारी | परिहार केलेल्या एकूण बाबी / शिफारसी | सदर काळाच्या शेवटी प्रलंबित खटले |
|---|---|---|---|---|---|
| १६,९५७ | ४,६५९ | २१,६१६ | ३,५५९ | ५७ | १८,०५७ |




**परिहार केलेल्या एकूण बाबी - 57**




**तक्रारींचे स्वरूप**


* शासकीय विभागांमध्ये शेती, वनविभाग, आरोग्य विभाग, आदिवासी विभाग, पर्यावरण विभाग, अन्य विभाग, महसूल विभाग इत्यादींचा समावेश होतो.

* संकीर्णमध्ये शासनाच्या संस्था, बँक, महामंडळे, कौटुंबिक वादविवाद वसूली करणारे एजंट, कर्जे इत्यादींचा समावेश होतो.

**एकूण तक्रारी - 4659**

जानेवारी, १९ ते डिसेंबर, २०१९ या काळातील न्यायालयामध्ये निकालात निघालेल्या खटल्यांचा तपशील

| कालखंड | प्राथमिक स्तरावरील खटले (लिमिने) | १७(१)(ब) | सुनावणीनंतर | शिफारसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी, २०१९ ते डिसेंबर, २०१९ | २१५५ | ० | १३४१ | ५३ | ३५४९ |



**विभाग ३ – माननीय अध्यक्ष व माननीय सदस्य किंवा अन्वेषण चमू (टीम) यांनी दिलेल्या भेटी**

तुरुंग, पोलीस ठाणे, संमेलने, परिषदा व अन्य महत्वाचे कार्यक्रम येथे आयोगाच्या माननीय सदस्यांनी दि. १ एप्रिल, २०१९ ते दि. ३१ मार्च, २०२० मध्ये दिलेल्या अधिकृत भेटींचा तपशील

अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) व प्रशिक्षण

संस्थेमार्फत भेट

| अ.क्र. | भेटीच्या तारखा | भेटीची जागा |
|---|---|---|
| १. | १९.१२.२०१९ | खटला क्रमांक २७३६/२०/२०१९ यामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार पोलीस निरीक्षकांनी तळोजा मध्यवर्ती तुरुंग, नवी मुंबई येथे भेट दिली. |
| २. | ०९.०३.२०२० | मुंबई मिरर या वृत्तपत्रामध्ये दि.०८.०३.२०२० रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार ऑर्थर रोड मध्यवर्ती तुरुंग येथे भेट दिली. |

दि. १ एप्रिल, २०१९ ते दि. ३१ मार्च, २०२० या वर्षात आयोगाचे माननीय सदस्य खालील परिषदा, चर्चासत्रे व अन्य महत्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहिले.

अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) व प्रशिक्षण संस्थेमार्फत भेट

| अ.क्र. | भेटीच्या तारखा | संस्थेचे नाव | सहभाग घेणारे |
|---|---|---|---|
| १. | १७.१२.२०१९ | आझाद मैदान पोलीस ठाणे | २५ कायद्याचे विद्यार्थी |
| २. | १७.१२.२०१९ | मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई | २५ कायद्याचे विद्यार्थी |
| ३. | १८.१२.२०१९ | अपनालय, झोपडपट्टी क्षेत्र | २५ कायद्याचे विद्यार्थी |
| ४. | १९.१२.२०१९ | बालसहाय्य संस्था, मानखुर्द | २५ कायद्याचे विद्यार्थी |
| ५. | २०.१२.२०१९ | ऑर्थर रोड, तुरुंग, मुंबई | २५ कायद्याचे विद्यार्थी |
| ६. | २१.१२.२०१९ | मानसिक (वेड्यांचे) रुग्णालय, ठाणे | २५ कायद्याचे विद्यार्थी |
| ७. | २६.०८.२०१९ | हरकिशनदास इस्पितळ | ५ एलएलएम विद्यार्थी |
| ८. | २९.०८.२०१९ | मिडीया हाऊस | ५ एलएलएम विद्यार्थी |
| ९. | ०३.०९.२०१९ | पोलीस तक्रार प्राधिकरण | ५ एलएलएम विद्यार्थी |
| १०. | ०५.०९.२०१९ | झोपडपट्टी/शासकीय कार्यालय, माटुंगा | ५ एलएलएम विद्यार्थी |
| ११. | ०९.०९.२०१९ | ठाणे तुरुंग | ५ एलएलएम विद्यार्थी |
| १२. | ११.०९.२०१९ | भायखळा तुरुंग | ५ एलएलएम विद्यार्थी |
| १३. | १३.०९.२०१९ | उच्च न्यायालय, मुंबई | ५ एलएलएम विद्यार्थी |
| १४. | १३.०९.२०१९ | प्रेरणा अशासकीय संस्था (एनजीओ, ) कामाठीपुरा | ५ एलएलएम विद्यार्थी |

**अंतर्वासीकरण (इंटर्नशिप)**

कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी हिवाळ्यात एक व उन्हाळ्यात एक असे दोन अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) कार्यक्रम राबवले जातात. हे विद्यार्थी अनेक देशातील विधी महाविद्यालये, विधी विद्यापीठे यातून येतात.

| अ.क्र. | कालावधी | कार्यक्रम | सहभाग घेणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | ०१.०७.२०१९ ते ३०.०७.२०१९ | उन्हाळ्यामधील अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) | २० |
| २. | ०१.१२.२०१९ ते ३१.१२.२०१९ | हिवाळ्यामधील अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) | २५ |

एल.एल.एमच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष जागी नेमणूक (फील्ड वर्क प्लेसमेंट)

| अ.क्र. | कालावधी | कार्यक्रम | सहभाग घेणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | २१.०८.२०१९ ते २०.०९.२०१९ | महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (एमएसएचआरसी) मध्ये एलएलएम विद्यार्थ्यांसाठी जागा | ०५ |

| अ.क्र. | केस नंबर | तुरुंगाबाहेर व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणी |
|---|---|---|
| १. | ३७७३/२०१७ | नाशिक मध्यवर्ती तुरुंग |
| २. | ६७३५/२०१८ | नाशिक मध्यवर्ती तुरुंग |
| ३. | ६९४/२०१८ | मुंबई मध्यवर्ती तुरुंग |
| ४. | १५२/२०१९ | मुंबई मध्यवर्ती तुरुंग |
| ५. | ६०४६/२०१८ | मुंबई मध्यवर्ती तुरुंग / ठाणे मध्यवर्ती तुरुंग |
| ६. | २७३६/१३/२०/२०१९ | मुंबई मध्यवर्ती तुरुंग |
| ७. | २१६/१३/३०/२०१९ | ठाणे मध्यवर्ती तुरुंग |
| ८. | १२४७/१३/३०/२०१९ | ठाणे मध्यवर्ती तुरुंग |
| ९. | २२८८/१३/३०/२०१९ | ठाणे मध्यवर्ती तुरुंग |
| १०. | ६३३६/२०१८ | चंद्रपूर जिल्हा तुरुंग |
| ११. | २०३६/१३/१४/२०१९ | कोल्हापूर मध्यवर्ती तुरुंग / येरवाडा मध्यवर्ती तुरुंग |
| १२. | ६१४५/२०१८ | येरवाडा मध्यवर्ती तुरुंग |
| १३. | ५९६२/२०१८ | नागपूर मध्यवर्ती तुरुंग |
| १४. | ३००७/१३/१७/२०१९ | नागपूर मध्यवर्ती तुरुंग |
| १५. | ३०१०/१३/१७/२०१९ | नागपूर मध्यवर्ती तुरुंग |

अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) व प्रशिक्षण

संस्थेमार्फत भेट

| अ.क्र. | भेटीच्या तारखा | संस्थेचे नाव | सहभाग घेणारे |
|---|---|---|---|
| १. | १३.०१.२०१७ | हर्ट फाऊंडेशन, मुंबई | २६ मानव हक्क पीजी डिप्लोमा विद्यार्थी |
| २. | २३.०३.२०१७ | शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई | ४७ कायद्याचे विद्यार्थी |

**अंतर्वासीकरण (इंटर्नशिप)**


कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी हिवाळ्यात एक व उन्हाळ्यात एक असे दोन अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) कार्यक्रम राबवले जातात. हे विद्यार्थी अनेक देशातील विधी महाविद्यालये, विधी विद्यापीठे यातून येतात.

| अ.क्र. | कालावधी | कार्यक्रम | सहभाग घेणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | ०१.०६.२०१६ ते ३०.०६.२०१६ | उन्हाळ्यामधील अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) | १४ |
| २. | ०१.१२.२०१६ ते ३०.१२.२०१६ | हिवाळ्यामधील अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) | १३ |

## विभाग-४ – स्त्रोत

### शासनाकडून वित्तीय वर्ष २०१९-२० साठी प्राप्त झालेला निधी

| | **रुपये हजारात** |
|---|---|
| वेतनासाठी अनुदान | २७,००० |
| वेतनेतर अनुदान | ८,००० |
| **एकूण** | ३५,००० |



## विभाग ५ –

## उदाहरणात्मक खटले

१. खटला क्रमांक : १०८७/२०१६

तक्रारदाराचे नाव : सुशांत बी. डोंगरे

प्रतिवादीचे नाव : पोलीस आयुक्त, नवीमुंबई

आदेशाचा दिनांक : २७ डिसेंबर, २०१८

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, हल्ल्याची घटना हा जरी दखलपात्र घटना असली आणि तक्रारदाराचा अहवाल दखलपात्र असला तरीही पोलिसांनी अदखलपात्र तो गुन्हा म्हणून नोंदला गेला आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर आयोगाने आयोगाच्या अन्वेषण विभागाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्र व इतर बाबींचे परिशीलन केल्यानंतर आयोगाला असे वाटते की, संबंधित पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक यांच्याकडून तक्रारदारांचा अहवाल हा दखलपात्र गुन्हा दाखल न करता ही बाब अदखलपात्र गुन्हा म्हणून दाखल करणे ही चूक झाली आहे. त्यामुळे आयोगाने खालील शिफारशी केल्या आहेत.

(अ) त्या जिल्ह्याचे अधीक्षक यांना संबंधित पोलीस ठाण्याला आदेश देऊन कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत तक्रारदारातर्फे हल्लेखोराविरुद्ध नियमित प्रथम माहिती अहवाल सादर करावा व तदनुषांगिक पावले उचलावीत.

(ब) नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना असा आदेश दिला आहे की, त्यांनी चूक करणाऱ्या आरोपीत पोलीस अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवणे व नियमानुसार त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे याचा प्रस्ताव करण्याचा विचार करावा व त्यासाठी संबंधित पोलीस उपायुक्त यांना आदेश द्यावेत.

| | |
|---|---|
| २. खटला क्रमांक : | एमएएस/४२०१/२०२० |
| तक्रारदाराचे नाव : | बिलाल खान |
| | हरेराम सी. राऊत आणि इतर |
| प्रतिवादीचे नाव : | सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | ३० डिसेंबर, २०१९ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरूप** :

तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, आंबेडकर नगर, कफ परेड, मुंबई येथे पुनर्वसित केलेले रहिवाशी यांना प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे निष्कासित केले.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने पाठवलेल्या नोटीसला प्रतिवादीने दिलेल्या उत्तराचे परिशीलन केले, अभिलेखाचे परिशीलन केले, सुनावणी पूर्ण झाली.

**आयोगाचा निर्णय** :

अभिलेखावरील कागदपत्रे व बाबी यांचा विचार आयोगाने केला व खालील शिफारसी करणे आयोग उचित समजतो.

(अ) महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनी तज्ज्ञ व्यक्तींची एक समिती गठीत करावी त्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, वन व महसूल विभागाचे तज्ज्ञ यांचा समावेश असावा. या समितीने आंबेडकर नगर, कफ परेड, मुंबई येथील अंदाजे १५०० इतक्या झोपडपट्टीवासियांनी (यादी जोडली आहे) यांचेसाठी पुनर्वसन प्रकल्प तयार करावा व तो शासनाकडे आवश्यक मान्यतेसाठी हा आदेश प्राप्त झाल्यावर तीन महिन्यात सादर करावा.

(ब)अशा रितीने गठीत केलेल्या समितीला उपरोक्त झोपडपट्टी रहिवाशांची सर्व कागदपत्रे पाहणे, त्यांची वा त्यांच्या प्रतिनिधींची तपासणी घेणे किंवा त्यांच्या दाव्याची तपासणी करणे व त्यांची पात्रता ठरवणे व पुनर्वसन करण्यासाठी शिफारसी करणे याचे अधिकार असावेत.

(क) अशा समितीद्वारे चौकशी करण्याची सर्व प्रक्रिया प्राधान्यक्रमाने घ्यावी व ती आयोगाने ठरवलेल्या विहित कालमर्यादित पूर्ण करावी.

३. खटला क्रमांक : एमएएस/१४०५/२०१७
तक्रारदाराचे नाव : श्वेता हर्षद दोशी
प्रतिवादीचे नाव : पोलीस उपआयुक्त, विभाग २, मुंबई
आदेशाचा दिनांक : ३० डिसेंबर, २०१९
गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप** :

तक्रारदार ही मुंबईमध्ये वकीली पेशा करणारी व्यक्ती आहे. तिच्या बहिणीवर शारीरिक हल्ला झाल्याने तिला (बहिणीला) इजा झाली व लोकांनी तिला (बहिणीला) नायर इस्पितळात आणले. तेथे मेडिकोबायोलॉजिकल केस (वैद्यकीय चिकीत्सा आवश्यक असलेली शारीरिक गुन्ह्याची बाब) दाखल करण्यात आली. याबाबतीत पोलिसांनी योग्य प्रथमदर्शन माहिती अहवाल दाखल करणे आवश्यक होते, तथापि, त्यांना असे आढळले की, तक्रारदाराच्या अहवालामध्ये काहीही तथ्य नाही. पोलिसांनी या बाबीकडे यथातथाच दृष्टीने पाहून कोणताही आधार न घेता ते या निष्कर्षाप्रत आले की या तक्रारीत काही अर्थ नाही. त्यामुळे त्यांनी कोणतीही कृती केली नाही.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने दिलेल्या नोटीसला प्रतिवादीनी उत्तर दिले. आयोगाने संबंधित इस्पितळाकडून कागदपत्रे मागवली व सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय** :

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व बाबी यांचे परिशीलन केल्यावर आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) तक्रारदारांनी दि. २ फेब्रुवारी २०१७ रोजी दाखल केलेल्या अहवालाच्या आधारे चूक करणाऱ्या दोन महिला पोलीस हवालदारांविरुद्ध – हवालदार क्र. ०८१३० कुमारी महादेव विंचू आणि महिला पोलीस हवालदार क्र.०९३७६ कुमारी आराध्या परब (ज्या मलबार हिल पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत) यांच्या विरुद्ध भारतीय दंड विधानाच्या संबंधित कलमांतर्गत प्रथमदर्शनी अहवाल सादर करावा व मा. सर्वोच्च न्यायालयाने ललिताकुमारी या खटल्यामध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील कारवाई करावी असा आदेश पोलीस उप आयुक्त, विभाग – २, मुंबई यांना द्यावा, असा आदेश आयोग मुंबई पोलीस आयुक्त यांना देत आहे.

(ब) चूक करणाऱ्या महिला पोलीसांच्या विरुद्ध शिस्तभंगाच्या नियमानुसार शिस्तभंगाची विभागीय कारवाई करण्याचा विचार पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांनी करावा.

(क) पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाने मलबार पोलीस ठाण्यावरील तत्कालीन प्रभारी अधिकाऱ्यांनी तक्रारदार श्वेता हर्षद दोशी आणि तेजल हर्षद दोशी यांना प्रत्येकी रु. ५०,००० इतकी नुकसानभरपाई द्यावी असा आदेश द्यावा कारण प्रभारी अधिकाऱ्यांनी तक्रारदारांच्या अहवालावरुन प्रथमदर्शनी माहिती अहवाल दाखल न करून त्यांच्या मानवी हक्कांचा भंग केला आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया कलम १५४ च्या प्रावधानांनुसार कारवाई करावी. उपरोक्त रकमेचे प्रदान हा आदेश प्राप्त झाल्यावर सहा आठवड्यात करावे, अन्यथा हा आदेश दिल्यापासून रक्कम देईपर्यंत १२.५% व्याज द्यावे.

(ड) पोलीस आयुक्त, मुंबई यांनी पोलीस बलासाठी योग्य कार्यसंस्कृती, प्रशिक्षण व अभिमुखता यासाठी कार्यालयीन मार्गदर्शक तत्वे तयार करावीत व विकसित करावीत. मूळ मानवी नीतीमूल्ये व घटनात्मक आचार यांच्या प्रती पोलीस दलात संवेदनशीलत्व यावे यासाठी योग्य कार्यसंस्कृती पोलीस दलात आणण्यासाठी पोलीस दलाला प्रशिक्षण देण्यासाठी विभागांतर्गत योग्य मार्गदर्शक तत्वे पोलीस आयुक्त, मुंबई यांनी घालून द्यावीत व विकसित करावीत.

४. खटला क्रमांक : एमएएस/२२७६/२०१७

तक्रारदाराचे नाव : अरुणा पी. चव्हाण आणि वंदना ए. देवकाते

प्रतिवादीचे नाव : मुख्य सचिव, सामान्य आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

आदेशाचा दिनांक : २७ डिसेंबर, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरुप :**

तक्रारदाराने अशी तक्रार केली आहे की, दि. १८ जानेवारी २०१७ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, बिलोटा, ता. मुसद, जिल्हा यव-तमाळ येथे कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले होते. हे शिबीर तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची कोणतीही अनुमती न घेता कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनी आयोजित केले होते. तेथील पद्धती यथातथाच (कॅज्युअल) असल्याने तीन स्त्रियांची प्रकृती गंभीर झाली व एका स्त्री रोग्याचा मृत्यू झाला. स्त्री रोग्यांची व उरलेल्या दोघींना नागरी रुग्णालयात नेऊन त्यांच्यावर उचित उपचार केले गेले व त्या शस्त्रक्रियेनंतरच्या समस्यांतून बऱ्या झाल्या.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने दिलेल्या सूचीचे उत्तर प्रतिवादीने दिले. खटल्याची कागदपत्रे, उत्तरे, प्रत्युत्तरे यांचे परिशीलन केले. सुनावणी पूर्ण केली

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोग खालील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) आरोग्य संचालक मुंबई यांनी चूक करणाऱ्या तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रशेखर बोगाडे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नील सातपुते यांनी तक्रारदार श्रीमती अरुणा प्रदीप चव्हाण व श्रीमती वंदना ए. देवकाते यांना संयुक्तपणे व एकत्रितरीत्या प्रत्येकी रु. २,५०,०००/- (रुपये दोन लाख पन्नास हजार) व एकत्रित रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख) इतके सदर आदेशाच्या तारखेपासून सहा आठवड्याच्या आत द्यावेत. सदर रक्कम सदर मुदतीत न दिल्यास सदर रक्कम देईपर्यंत त्यावर १२.५०% इतक्या दराने व्याज द्यावे लागेल.

(ब) संचालक, प्राथमिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी प्रधान सचिव, आरोग्य, मुंबई यांच्या कार्यालयाशी समन्वय साधून, आरोग्य अधिकारी, निवासी डॉक्टर्स, त्यांच्या हाताखालील काम करणारे कर्मचारी यांना सेवा व पुढील परिच्छेदात दिलेल्या मानवी हक्कांच्या बाबतीत संवेदनशीलत्व जागरुक करण्यासाठी एक कार्यक्रम आयोजित करावा.

(क) कोणत्याही रोग्यावर मानवतेने, आदरपूर्वक व वैद्यकीय नियम व नियमन यानुसार उपचार करण्याबाबतची शिस्त व शिष्टाचार यानुसार उपचार करण्याबाबत सर्व स्तराच्या वैद्यकीय बंधूंना जागरुक करावे व अद्यतन करावे. हा आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा आठवड्यामध्ये या आदेशाची पूर्तता करावी व मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम १८(३) च्या प्रावधानांनुसार व महाराष्ट्र मानवी हक्क आयोग (संरक्षण) नियमन २००१ च्या नियमन २१ ते २४ नुसार त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

| | |
|---|---|
| ५. खटला क्रमांक : | एमएएस-स्युओ-मोट्यू/६०/१३/१६/२०१९ |
| तक्रारदाराचे नाव : | इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रातील "डॉक्टर निलंबित, अधीक्षकांची बदली केली "या बातमीची दखल घेऊन आयोगाने स्वत:हून केलेली कृती |
| प्रतिवादीचे नाव : | महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका<br>डीन, ट्रॉमा इस्पितळ, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | २७ जानेवारी, २०२० |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप** :

दिनांक ३१ डिसेंबर २०१९ च्या इंडियन एक्सप्रेस या दैनिकामध्ये पुढील बातमी छापून आली होती. "मोतिबिंदूची शस्त्रक्रिया केल्यानंतर सात रुग्णांना गंभीर जंतूसंसर्ग झाला व त्यामध्ये चार रुग्णांची दृष्टी पूर्णपणे गेली"

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने या बाबतीत स्वतः होऊन कृती केली आहे. आयोगाने पाठवलेल्या नोटीसला प्रतिवादीने उत्तर दिले आहे. सुनावणी पूर्ण झाली.

**आयोगाचा निर्णय** :

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोगाने पुढील शिफारसी केल्या आहेत :—

(अ) डॉ. अरुण चौधरी, सहाय्यक मानद व ट्रॉमा केस नेत्रशास्त्र विभागाचे मुख्य, डॉ. बावा व डीन कूपर इस्पितळ, डॉ. मोहमद साबिर, डॉ. कायसगल काचर, कर्मचारी परिचारिका श्रीमती वीणा क्षीरसगे, श्रीमती दिप्ती खेडेकर, श्रीमती समृद्धी साळुंके, व्रणोपचारक (ड्रेसर) श्री. अशोक कांबळे या सर्वांनी ज्या चार रुग्णांची दृष्टी पूर्णपणे गेली अशांच्या म्हणजेच श्री. गौतम गव्हाणे, श्रीमती संगित राजभर, श्री. रफिक खान व श्रीमती फातिमाबी यांना प्रत्येकी रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख) इतकी रक्कम एकत्रितरीत्या व वेगवेगळे असे द्यावी कारण त्या रुग्णांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे. तसेच अन्य दोन रुग्ण श्रीमती सीता सिंग आणि श्रीमती बेलुदेवी (Page No २३ of the English report) खडके यांना मानसिक धक्का बसल्याने त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे, त्यांना प्रत्येकी रु.१.०० लाख इतकी रक्कम द्यावी.

(ब) विद्वान पालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी चूक करणाऱ्या उपरोक्त अधिकाऱ्यांकडून भरपाईची सदर रक्कम वसूल करावी व नियमानुसार पडताळणी व तपासणी करून सदर पीडीत व्यक्तीच्या खात्यात थेट भरावी.

(क) सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर ६ आठवड्याच्या आत त्याचे अनुपालन करावे अन्यथा तसे न करणारे अधिकारी या आदेशाच्या दिनांकापासून सदर रक्कम पूर्णपणे देण्याच्या तारखेपर्यंत १२% व्याज देण्यास जबाबदार राहतील.

(ड) जोगेश्वरी पोलीस स्थानकामध्ये नोंदलेल्या गुन्ह्यांचे अन्वेषण त्वरेने करावे व त्याच्या अनुपालनाचा अहवाल विद्वान पोलीस उप आयुक्त, विभाग-१०, मुंबई यांनी या आयोगाला सादर करावा.

(इ) चूक करणारे अधिकारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्राधान्य क्रमाने करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(फ) विद्वान महापालिका आयुक्त यांनी तसेच जे.जे. इस्पितळातील तज्ज्ञांच्या चमूने केलेल्या शिफारशी शिस्तपालन व अशा युनिटची कार्यपद्धती सुरळीत करण्यासाठी अंमलात आणाव्यात.

(ख) जागरुकता व संवेदनशीलता कार्यक्रम सर्व स्तरांवर नियमितपणे वेळोवेळी आयोजित करावेत की ज्यायोगे अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

६. खटला क्रमांक : एमएएस/२९४४/२०१७

तक्रारदाराचे नाव : ॲड. प्रकाश के. अहेर

प्रतिवादीचे नाव : विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक
जिल्हाधिकारी, अहमदनगर,
पोलीस अधीक्षक, अहमदनगर

आदेशाचा दिनांक : १४ जानेवारी, २०२०

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरुप** :

सदर तक्रार संगमनेर तालुक्यात, वंचित समाजासाठी वकीलीचा व्यवसाय करणाऱ्या एका वकिलाने केली आहे. सदर वकीलाच्या विरुद्ध असलेल्या राजकीय पक्षाने वकीलाच्या फोटोला पादत्राणांचा हार घालून त्यांची मिरवणूक काढली. संगमनेर पोलिसांनी यावर काहीही कृती केली नाही.

**आयोगाने केलेली कृती :**

या घटनेची दखल आयोगाने स्वतः होऊन घेतली. आयोगाने पाठवलेल्या नोटीसला प्रतिवादीने उत्तर दिले. सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय** :

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोग खालील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) पोलीस महासंचालक, मुंबई यांनी पटणा उच्च न्यायालयाने एम.सिंग आणि इतर एआयआर १९८६ पटना ३२४ या खटल्यामध्ये दिलेल्या निकालाच्या प्रती विशेषतः परिच्छेद क्र.५३, ज्यामध्ये गुन्ह्याचे अन्वेषण करणाऱ्या संस्थांवर गुन्ह्यांचे अन्वेषण फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये दिलेल्या व समाविष्ट नियमांच्या व नियमनांच्या चौकटीमध्ये वाजवी व योग्य वेळेमध्ये पूर्ण करावे असे आदेश आहेत, त्याच्या प्रती अभिसरीत कराव्यात.

(ब) सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी विशेषतः प्रारंभिक पातळीवर सेवेत रुजू होणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांसाठी याबाबतीतील संवेदनशीलता व जागरुकता कार्यक्रम वेळोवेळी आयोजित करावेत. पोलीस अधिकाऱ्यांचे सर्वसामान्य जनतेबाबत कर्तव्य काय आहे यावर अशा कार्यक्रमांचा भर असावा. तसेच या कार्यक्रमातून कार्यपद्धतीबाबतचा कायदा या अधिकाऱ्यांच्या मनावर असा बिंबवावा की ज्यायोगे, संबंधित मंचांचा प्रकोप होऊन कारवाईची पाळी येऊ नये.

७. खटला क्रमांक : एमएएस/९९४/२०१६

तक्रारदाराचे नाव : डॉ. योगेश दुबे

प्रतिवादीचे नाव : जिल्हाधिकारी, नागपूर

जिल्हाधिकारी, नाशिक

आदेशाचा दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरुप :**

डॉ. योगेश दुबे यांनी ही तक्रार सादर केली. त्यामध्ये त्यांनी विदर्भ विभागात तसेच नाशिक विभागातील काही भागातील रिक्षा ओढणाऱ्या व्यक्तींच्या दयनीय अवस्थेबाबत तक्रार केली आहे. ही तक्रार अशा व्यक्तींसाठी कोणतेही सामाजिक सुरक्षा कवच, आरोग्य विमा या बाबी नाहीत अशी आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

उपरोक्त तक्रार विचारात घेऊन व घटनेच्या कलम २१ चे परिशीलन करून आयोग खालील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांच्या कार्यालयाला असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी रिक्षा ओढण्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना सामाजिक सुरक्षा, जीवन विमा, आरोग्य विमा इत्यादी संरक्षण प्राप्त होणे, परवाने प्राप्त होणे, हाताने ओढण्याच्या रिक्षांऐवजी बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षा, ई-रिक्षा प्राप्त होणे, त्यांच्या मुलांना शिक्षण मिळणे, त्यांच्यासाठी कल्याण योजना, त्यांच्यातील वृद्ध व्यक्तींना, अपंग व्यक्तींना निवृत्ती वेतन मिळणे यासाठी मार्गदर्शक तत्वे घालून देण्यासाठी एक तज्ञ समिती गठित करण्याची शक्यता तपासून पहावी की ज्याद्वारे समाजातील वंचित घटकांचे संरक्षण होईल.

८. खटला क्रमांक : एमएएस/१३६०/२०१७

तक्रारदाराचे नाव : मो. यासिन मो. शकिल शेख

प्रतिवादीचे नाव : अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे

आदेशाचा दिनांक : ३० डिसेंबर, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरुप** :

तक्रारदाराची तक्रार अशी आहे की, त्यांनी श्री. आशिश राजू हुंडेकर यांच्याकडे काही रक्कम गुंतवली होती. श्री. हुंडेकर यांनी त्या रकमेवर खूप मोठा परतावा देण्याचे कबूल केले. तथापि, नेहमीप्रमाणे त्यांना फसवले, तक्रारदार प्रथमदर्शनी अहवाल नोंदण्यासाठी पोलीस ठाण्यात पोचले. त्यांना गुन्हा शाखा, पुणे येथील महिला अधिकाऱ्याचा फोन आला. त्या श्री. हुंडेकरांच्या पत्नी होत्या. पोलीस प्रभारी अधिकाऱ्यांनी तक्रारदाराला पक्षपाती व स्वेच्छानुसार वागणूक दिली.

**आयोगाने केलेली कृती :**

नोटीस जारी केली, त्यानुसार प्रतिवादींनी उत्तर दाखल केले.

**आयोगाचा निर्णय** :

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोग खालील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे यांनी सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती शीतल दयानंद भालेकर (Page No. २८ of the English report) यांना असा आदेश द्यावा की श्रीमती भालेकर यांनी त्यांच्या अधिकाराचा व पदाचा गैरवापर केला आणि तक्रारदार श्री. मोहमद यासिन मोहमद शकील शेख यांचे मानवी हक्क धुडकावून लावल्या कारणाने श्री. शेख यांना रु. ५०,०००/- इतकी नुकसानभरपाई द्यावी. सदर प्रदान हा आदेश जारी केल्यापासून सहा आठवड्यामध्ये करावे. अन्यथा ती रक्कम देईपर्यंत त्यावर १२.५% व्याज द्यावे. सदर रक्कम वेतन प्रदान अधिकाऱ्यांनी श्रीमती भालेकर यांच्या वेतनातून नियमित हप्त्याने वसूल करावेत.

(ब) मूळ मानवी नीतीमूल्ये व घटनात्मक आचार यांच्या प्रती संवेदनशीलत्व पोलीस दलात यावे यासाठी योग्य कार्यसंस्कृती पोलीस दलात आणण्यासाठी पोलीस दलाला प्रशिक्षण देण्यासाठी विभागांतर्गत योग्य मार्गदर्शक तत्वे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी घालून द्यावीत व विकसित करावीत.

९. खटला क्रमांक : एमएएस/४१६९/२०१४

तक्रारदाराचे नाव : भूषण जे. जैस्वाल

प्रतिवादीचे नाव : जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथील प्रधान न्यायाधीश
पोलीस अधिक्षक, औरंगाबाद

आदेशाचा दिनांक : ११ मार्च, २०२०

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरुप** :

या तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, गस्त घालणाऱ्या पोलीस चमू (दरोडखोरीविरुद्धचा कक्ष) दि. २९ सप्टेंबर २०१४ रोजी रात्री त्याच्या हॉटेलमध्ये घुसला व त्याचा मानसिक व शारिरीक छळ केला.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने नोटीस जारी केली, त्यानुसार प्रतिवादींनी उत्तर दाखल केले, सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय** :

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोग खालील शिफारसी करणे उचित समजतो :—

(अ) सदर चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केला व कार्यपद्धतीबद्दलच्या कायद्याचा भंग केला. म्हणून त्यांच्याविरुद्ध कृती करण्याची शक्यता अतिरिक्त मुख्य सचिव (गृह विभाग) मंत्रालय, मुंबई यांनी तपासून पहावी.

(ब) अतिरिक्त मुख्य सचिव (गृह विभाग) मंत्रालय, मुंबई यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथील प्रधान न्यायाधीश यांच्या कार्यालयाला अशी शिफारस करावी की, त्यांनी संबंधित दंडाधिकाऱ्यांना चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध कायद्याच्या तरतुदींनुसार खटला भरण्याचे आदेश द्यावेत.

(क) अतिरिक्त मुख्य सचिव (गृह विभाग) मंत्रालय, मुंबई यांनी चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना असा आदेश द्यावा की त्या पोलीस अधिकाऱ्यांनी तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केल्यामुळे तक्रारदाराला हा आदेश प्राप्त झाल्यावर सहा आठवड्याच्या आत प्रत्येकी एक लाख (असे एकूण रुपये चार लाख) द्यावेत.

१०. खटला क्रमांक : एमएएस-स्युओ-मोट्यू केस नं.५९/२०१८

तक्रारदाराचे नाव : आयोग स्वत:हून

प्रतिवादीचे नाव : आयुक्त महानगर पालिका, ठाणे महानगर पालिका, ठाणे

पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण)

संपादक, सामना (page ३० of English Report) मराठी वृत्तपत्र

कार्यकारी अभियंता, एमएसईबी, ठाणे

अस्मा दोस मोहम्मद बलवार

मे. सोल्युशन ॲडव्हर्टायझिंग, ठाणे

आदेशाचा दिनांक : ८ एप्रिल, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरुप :**

दैनिक पुढारी (page ३० of English Report)या वृत्तपत्रामध्ये दि. १९ ऑक्टोबर २०१८ रोजी अशी बातमी आली की बस थांब्यावर वाट पहात असलेला एक प्रवासी विजेचा धक्का लागून मरण पावला. सक्षम अधिकाऱ्यांनी सदर दुर्दैवी घटना मान्य केली नाही व त्या घटनेबद्दल ते स्वतःची जबाबदारी किंवा दायित्व मान्य करीत नाहीत.

**आयोगाने केलेली कृती :**

सूचना जारी केली, त्यानुसार प्रतिवादींनी उत्तर सादर केले. सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोग खालील शिफारसी करणे उचित समजतो :—

(अ) संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सर्व विभागातील सर्व विद्युत निरीक्षकांना मुख्य विद्युत निरीक्षकांनी विद्युत अधिनियम, २०१३ च्या कलम ५० व ५३ ची व त्या अंतर्गत केलेल्या विद्युत अधिनियम, २००३ मधील नियम ६ व ७ च्या तरतुदींची अंमलबजावणी, पर्यवेक्षण यासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्वे घालून द्यावीत, असा आदेश संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (एमएसईडीसीएल) यांनी जारी करावा. या मार्गदर्शक तत्वांमध्ये वीज चोरणाऱ्या गुन्हेगारांवार कडक पहारा ठेवून पकडणे व या चोरीवर नियंत्रण ठेवणे यावर भर असावा की ज्याद्वारे अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

(ब) पुढील परिच्छेदामध्ये सविस्तर दिलेल्या कारणांसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (एमएसईडीसीएल) यांनी मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांना रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख) द्यावेत. त्या वारसदारांना आधीच रुपये चार लाख नुकसानभरपाई दिली आहे. अशा रीतीने संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मृत झालेल्या व्यक्तीच्या विधवेला एकूण रु. १४,००,०००/- इतकी नुकसान भरपाई हा आदेश प्राप्त झाल्यावर सहा आठवड्यात द्यावी.

(क) सदर मृत व्यक्तीची विधवा पत्नी व त्या मृत व्यक्तीचे अन्य कायदेशीर वारसदार आपल्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्यासाठी मर्यादांच्या अधिनियमांच्या अधिन राहून (लॉ ऑफ लिमिटेशन) सक्षम न्यायालयात मे. सोल्युशन ॲडव्हर्टायझिंग एजन्सी यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्यास मुक्त आहेत.

**विभाग ६ – आयोगाच्या शिफारसीबाबत सरकारचे अनुपालन किंवा नकार**

| आदेश दिनांक | शिफारस | प्राप्त झालेला अनुपालन अहवाल / पत्रे |
|---|---|---|
| ०८.०३.२०१६ | मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसदारांना रु.५०,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | 1. अतिरिक्त पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याकडून दि.२४.०४.२०१७ चे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी असे म्हंटले आहे की, पोलिसांनी तक्रारदाराविरुद्ध नि-यमांनुसार कारवाई केली आहे. सदर तक्रारदार गुन्हेगारी वृत्तीचे आहेत. त्यामुळे त्यांना रु.५०,०००/- इतकी रक्कम देणे योग्य नाही.<br>2. पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याकडून दि.०१.०२.२०१९ चे पत्र प्राप्त झाले व त्यासोबत मृत व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधीला रु.५०,०००/- दिल्याची पावती प्राप्त झाली. |
| १४.०३.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी तक्रारर दाराला रु.१,००,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी | 1. तक्रारदारांना नुकसान भरपाई देण्यास मान्यता देणाऱ्या शासन निर्णयासह दि.३१.१०.२०१८ चे पत्र प्राप्त झाले.<br>2. तक्रारदारांना नुकसान भरपाई दिल्याच्या पावतीसह दि.२६.०३.२०१९ चे पत्र प्राप्त झाले. |
| २८.११.२०१६ | गृह व आरोग्य विभागाने श्री. सुब्रमण्यम स्वामी (मृत व्यक्तीचे वडील) यांना अंतरिम नुकसान भरपाई म्हणून रु.१५,००,०००/- (रुपये पंधरा लाख) एकएकटे व एकत्रित द्यावेत. | 1. मृत व्यक्तीच्या वडिलांना रु.७.५० लक्ष (५०%) नुकसान भरपाई देण्यास मान्यता देण्याचे पत्र आरोग्य विभ भागाकडून प्राप्त झाले.<br>2. पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रामीण) यांच्याकडून दि.०८.०४.२०१९ चे पत्र व नुकसान भरपाई पोटी रु.७,५०,०००/- ऐवजी रु.१,००,०००/- प्राप्त झाल्याची पावती प्राप्त झाली. |
| ०८.११.२०१७ | राज्याने तक्रारदाराला नुकसान भरपाईपोटी रु.१०,०००/- द्यायचे आहेत. | 1. गृह खात्याकडून तक्रारदाराला रु.१०,०००/- देण्याबाब बतचे पत्र दि.३०.०१.२०१९ चे प्राप्त झाले.<br>2. नुकसान भरपाईच्या प्रदानाच्या प्राप्तीच्या पावतीसह दि.१२.०४.२०१९ चे पत्र गृह मंत्रालयाकडून प्राप्त झाले. |
| ०७.०९.२०१८ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी तक्रारदात राला रु.२५,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यायची आहे. | 1. गृह विभागाकडून दि.११.०२.२०१९ चा शासन निर्णय प्राप्त झाला त्याद्वारे त्यांनी तक्रारदाराला रु.२५,०००/- देण्याला मान्यता दिली आहे.<br>2. अतिरिक्त पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग यांनी सहसचिव, गृह विभाग यांना उद्देशून लिहिलेले पत्र व तक्रार-दाराला नुकसान भरपाईची रक्कम दिल्याच्या पुराव्याची प्रत प्राप्त झाली. |
| २१.०१.२०१७ | शासनाने तक्रारदाराला रु.५०,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यायची आहे. | 1. गृह विभागाकडून दि.१४.०३.२०१८ चे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये नुकसान भरपाईची रक्कम रु.५०,०००/- हिचा पुनर्विचार करावा अशी विनंती केली आहे.<br>2. दि.११.११.२०१९ चे पत्र व त्याबरोबर तक्रारदाराला नुकसान भरपाईची रक्कम रु.५०,०००/- दिल्याची पावती प्राप्त झाली. |

| | | |
|---|---|---|
| ०७.०५.२०१९ | सदर ठिकाणच्या रहिवाशांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सुविधा / गरजा पुरवाव्यात. | आरोग्य विभागाकडून दि.२६.११.२०१९ चे पत्र व त्याबरोबर त्या परिसरात दिलेल्या सुविधांचा तपशील प्राप्त झाला. |
| १२.१२.२०१८ | सदर परिसरातील रहिवाशांना ज्या आरोग्याच्या गैरसाईंना व अडचणींना तोंड द्यावे लागत आहे त्याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेने चौकशी करावी व त्यानुसार पैशोमध्ये नुकसान भरपाई द्यावी. | आरोग्य विभागाकडून दि.०९.०८.२०१९ चे पत्र तसेच अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालामध्ये आयोगाच्या आदेशानुसार उचललेल्या पावलांचा तपशील दिला व तसेच रहिवाशांकडून प्राप्त झालेले पत्र प्राप्त झाले ज्यामध्ये सदर रहिवाशी बृहन्मुंबई महानगर पालिकेने दिलेल्या सेवेबाबत संतुष्ट आहेत व त्यांची काहीही तक्रार नाही असे नमूद केले आहे. |
| ३०.०७.२०१९ | तक्रारदार यांनी पोलीस अधिक्षक, नंदुरबार यांना रु.५,०००/- इतका दंड देणे आहे. | पोलीस अधिक्षक, नंदुरबार यांच्या दि.०८.०९.२०१९ चे पत्र व तक्रारदाराने रु.५,०००/- चा दंड दिल्याचा अहवाल प्राप्त झाला. |
| १८.११.२०१६ | तक्रारदाराला अंतरिम भरपाई म्हणून रु.५,००,०००/- द्यावेत. | 1. रु.५,००,०००/- नुकसान भरपाईऐवजी रु.५०,०००/- नुकसान भरपाई मंजूर केल्याचा शासन निर्णय प्राप्त झाला.<br>2. गृह विभागाकडून दि.१३.०२.२०१९ चे पत्र व तक्रारदाभराला नुकसान भरपाईची रक्कम प्रदान केल्याचा पुरावा प्राप्त झाला. |

**नकारः**

| आदेश दिनांक | शिफारस | नकार अहवाल |
|---|---|---|
| १२.०७.२०१७ | शासनाने तक्रारदाराला रु.५०,०००/- नुकसान भरपाई द्यावी. | 1. पोलीस आयुक्त, ठाणे यांच्याकडून आयोगाच्या आदेशाचे अनुपालन करण्याबाबतचे अग्रेषण पत्राची प्रत मिळाली.<br>2. गृह विभागाकडून दि.०२.०२.२०१७ चे पत्र प्राप्त झाले, त्यामध्ये असे म्हंटले होते की, पोलीस आयुक्त, ठाणे यांनी असे आदेश दिले आहेत की, त्यांनी पुनरावलोकन अर्ज करावा.<br>3. गृह विभाग यांच्याकडून तक्रारदाराला नुकसान भरपाई देण्याला नकार देणारे दि.०७.०२.२०१९ चे पत्र प्राप्त झाले. |
| १८.०८.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी तक्रारदाराला रु.५०,०००/- इतकी नुकसान भरपाई म्हणून द्यावी. | गृह विभागाकडून दि.१७.०१.२०१९ चे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी नुकसान भरपाईची रक्कम तक्रारदाराला देण्याला नकार दिला आहे. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई